देशोन्नती दि 22/03/2023

# इतवारा, ग्रामीण पोलिसांच्या संयुक्त कारवाईत ६ लाखांचा गुटखा जप्त



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ इतवारा व नांदेड ग्रामीण पोलिसांनी २० मार्च रोजी केलेल्या संयुक्त कारवाईत ५ लाख ८० हजार ३८ रुपये किंमतीचा गुटख्याचा साठा जप्त केला. याप्रकरणी इतवारा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

शासनाने आरोग्यास घातक असणाऱ्या गुटख्यावर प्रतिबंध घातला आहे, असे असतांनाही गुटख्याची सर्रास  विक्री करुन त्यांचा साठा उपलब्ध ठेवत आहेत, अशा प्रकारे इतवारा पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या मोसीन कॉलनी येथील न्यु खान किराणा दुकान मालकाच्या घरात गुटख्याचा साठा असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीवरुन इतवारा ठाण्याचे पोनि भगवान धबडगे, पोउपनि रमेश गायकवाड, ग्रामीण ठाण्याचे पोनि अशोक घोरबांड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि आनंद बिचेवार व इतर कर्मचाऱ्यांनी सदर घरावर धाड टाकली. या धाडीत  विविध कंपन्याचा ५ लाख ८० हजार ३८ रुपये किंमतीचा गुटख्याचा साठा आढळून आला. याप्रकरणी सपोउपनि देवीदास बिसाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.